F. O प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** मोधा **Year (वर्ष):** 2023

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0271 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/08/2023 02:38 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Date From (दिनांक पासून):** 04/08/2023

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date To ( दिनांक पर्यंत):** 04/08/2023

**Time From (वेळेपासून):** 17:57 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:57 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/08/2023 **Time (वेळ):** 02:23 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 006 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/08/2023 02:23 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कल्याण मंडप प्रभाग समीती क,कार्यालय महानगर पालीका परभणी, परभणी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** महेंद्र विश्वनाथ हिंगे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2000 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.**(अ. क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | उघडा महादेव ,सुंदराईनगर परभणी ,मोधा,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | उघडा महादेव ,सुंदराईनगर परभणी ,मोधा,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-9175698379

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शेरखान नुरखान पठाण | | | 1. जिल्हा परीषद प्राथमिक शाळेजवळ, ताडकळस ,तडकलास,परभणी,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ. क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि. 04/08/2023

मी महेंद्र विश्वनाथ हिंगे वय 23 वर्ष, व्यवसाय शिक्षण रा उघडा महादेव सुंदराईनगर परभणी
मोनं. 9175698379.

फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असून माझी आई नामे इंदुबाई विश्वनाथ हिंगे हिने दि. 09/12/2020 रोजी श्री किरण धोंडीबा सुर्यवंशी यांचेकडून परभणी महानगर पालीका हद्दीतील सर्वे न. 19 व गट न. 55 ज्याचा मनपा घर न. 1955/78 व मालमत्ता क्र. 618 पैकी उत्तरेकडील 120 चौ. मिटरचा मोकळा प्लॉट खरेदी केला आहे.

माझे आईच्या सांगण्यावरुन मी दि.28/07/2023 रोजी प्लॉटचे खरेदीखत घेवून कल्याण मंडपम येथील महानगर पालीकाचे प्रभाग समिती 'क' च्या कार्यालयात जावुन कर निरीक्षक शेरखान पठाण यांना भेटलो आणि माझे आईचे नावे खरेदी केलेला प्लॉटचे हस्तातरण आईच्या नावे करावयाचे असल्याचे सांगितले. त्यावेळी कर निरीक्षक शेरखान पठाण यांनी मला सदर कामाचे 11,000/- रूपये लागतील असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना पैसे जास्त होतात थोडे कमी करा असे म्हणालो असता त्यांनी मला शासकीय फी 6000/- रू आहे आणि 5000/- रूपये सर्वांना सहीसाठी द्यावे लागतील असे सांगितले आणि माझ्या कामासाठी मला कार्यालयामध्ये अर्ज देण्यास सांगीतले. मला कर निरीक्षक श्री शेरखान पठाण हे जास्तीची रक्कम 5000/- रूपये मागत असुन ती लाच आहे हे मला माहीत आहे.

मला शेरखान यांना लाच देण्याची इच्छा नाही. माझा आणि त्यांचा पैसे देण्या घेण्याचा व्यवहार नाही किंवा माझी त्यांचेशी दुष्मनी नाही.

मी माझे कामासाठी आज दि. 04/08/2023 रोजी कर निरीक्षक शेरखान पठाण यांना भेटण्यास जाणार आहे. त्यांनी मला माझे कामासाठी स्वतः अगर इतरा मार्फत शासकीय फिस व्यतिरीक्त लाच म्हणून जास्तीचे पैशांची मागणी केल्यास त्याचेवर कायदेशीर कार्यवाही करावी अशी तक्रार दिली आहे.

त्यावरून पोलीस उपअधीक्षक श्री. इप्पर यांनी तात्काळ आगार व्यवस्थापक, रा.प.म. परभणी यांना पत्र देवून दोन शासकीय पंच म्हणुन 1) श्री. अशोक दत्तराव हरकळ, वाहक बि.नं. 17890, रा.प. परभणी आणि 2) श्री. रामेश्वर रंगनाथराव निर्वळ, चालक बि.नं. 19190, रा.प.म. परभणी यांना उपलब्ध करून घेतले. दोन्ही पंचांची व माझी ओळख करून देण्यात आली. मी त्यांना माझी तक्रार तोंडी कथन केली. तसेच पोलीस उपअधीक्षक श्री. इप्पर यांनी माझी हस्तलिखीत तक्रार पंचांना वाचण्यास दिली. दोन्ही पंचानी माझी तक्रार वाचून सदर तक्रारीवर सहया केल्या.

त्यानंतर प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात करण्यात आली. आंम्हाला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवून दोन्ही पंच तसेच सापळा

पथकातील अधिकारी व माझे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डरच्या सहायाने रेकॉर्ड केले. पडताळणी कार्यवाही दरम्यान मी व पंच क्र. 1 अशोक हरकळ असे व्हाईस रेकॉर्डरसह माझेकडील मोटारसायकलने जायकवाडी परिसरातील कल्याण मंडपम येथील प्रभाग समिती 'क च्या कार्यालयात कर निरीक्षक श्री. शेरखान पठाण यांना भेटण्यासाठी गेलो. तेथे शेरखान पठाण यांचे टेबलजवळ जावून शेरखान यांची भेट घेतली. त्या भेटी दरम्यान पंच क्र. 1 हारकळ यांचे समक्ष माझी व शेरखान यांची माझे कामाचे अनुशंगाने चर्चा झाली. त्यावेळी कर निरीक्षक शेरखान यांनी मला माझे आईचे नावे खरेदी केलेल्या प्लॉटचे हस्तांतरण करण्यासाठी 11,000/- रूपये खर्च येईल असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना शासकीय फी किती आहे. त्यांची पावती मिळेल काय असे विचारले असता त्यांनी मला सदर कामासाठी व्हॅल्युवेशन नुसार 6500/- रू. फी लागेल व सर्व टेबलासाठी 4500/- रू द्यावे लागतात असे सांगुन एकुण 11,000/- रू. आणून देण्यास सांगितले. कर निरीक्षक शेरखान यांनी मागणी केलेल्या 11,000/- रू. पैकी 6500/- रू. शासकीय फी आणि 4500/- रू. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

दि. 04/08/2023 रोजी पडताळणी दरम्यान माझे व कर निरीक्षक शेरखान पठाण, महानगर पालीका परभणी प्रभाग समिती 'क' यांचे पंच क्र. 1 अशोक हरकळ यांचे समक्ष झालेले सदर संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डरच्या सहाय्याने मेमरीकार्ड मधील फोल्डर क्र. 1 मधील फाईल क्र. 5 मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. सदरचे सर्व संभाषण पंच क्र. 2 रामेश्वर निर्वळ व सापळा पथकातील अधिका-यानी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी येथे ऐकले आहे.

त्यानंतर सापळा कार्यवाही दरम्यान उपअधीक्षक श्री. इप्पर साहेब यांनी मला, पंचांना व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत सुचना दिल्या. तसेच अॅंथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्म आणि वापरा बाबत माहिती दिली. त्याबाबत पोह/हनुमंते यांचे करवी प्रात्यक्षीक करून दाखविण्यात आले. मी हजर केलेल्या 11,000/- रूपयांना हनुमंते यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावून कर निरीक्षक श्री. शेरखान पठाण यांना देण्यासाठी माझे अंगावरील जर्किनच्या उजव्या बाजुच्या खिशात व्यवस्थीत ठेवून दिली. त्यानंतर मी व पंच क्र. 1 हरकळ असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी कार्यालय येथून माझेकडील मोटारसायकलने शेरखान पठाण यांना लाचेची रक्कम देण्यासाठी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरसह कल्याण मंडपम कडे निघालो. आमचे पाठोपाठ सापळा पथक मोटारसायकलने निघाले. मी व पंच क्र. 1 अषोक हरकळ असे कल्याण मंडपम येथे गेलो. कल्याण मंडपमचे परिसरात मोटारसायकल खाली उभी करून आंम्ही कल्याण मंडपमचे पहिल्या मजल्यावरील प्रभाग सामिती 'क' चे कार्यालयामध्ये पोहंचलो. सापळा पथक कल्याम मंडपमचे आवारामध्ये आजुबाजूला आमचेवर लक्ष ठेवून थांबले.

मी व पंच क्र. 1 हरकळ असे कर निरीक्षक शेरखान पठाण यांचे टेबलजवळ जावून त्यांची भेट घेतली. त्यावेळी मी त्यांना तुंम्ही सांगितल्या प्रमाणे 11000/- रू. आणले आहेत असे म्हणालो असता शेरखान पठाण यांनी माझेकडून पंच क्र. 1 हरकळ यांचे समक्ष 11,000/- रू रक्कम उजव्या हाताने स्विकारून त्यांचे स्वतःचे अंगावरील पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. ते मला मी भरलेल्या रक्कमेची पावती देतील म्हणूण मी कांहीवेळ वाट पाहीली पण त्यांनी मला पैशांची पावती दिली नाही. मी त्यांना पावती कधी भेटेल असे विचारले असता त्यांनी पावती आठ/दहा दिवसानंतर भेटेल असे मला सांगितले. ते मला पावती देणार नाहीत अशी माझी खात्री झाली. त्यामुळे मी प्रभाग समितीचे कार्यालयाचे बाहेर येवून माझे डोक्यावरील कॅप हातात घेवून पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळेस सापळा पथकाने येवून कर निरीक्षक शेरखान पठाण यांना लाचेच्या रक्कमेसह पकडले व 17.57 वा. माझेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक श्री इप्पर साहेबांनी शेरखान यांना त्यांचे पुर्ण नाव गाव विचारले असता त्यांनी आपले नाव शेरखान नुरखान पठाण, वय 53 वर्ष व्यवसाय कर निरीक्षक, प्रभाग समिती 'क', महानगर पालीका परभणी रा. जिल्हा परीषद प्राथमिक शाळेजवळ ताडकळस असे सांगितले. त्यानंतर त्यांना सहायक आयुक्त श्री अदनान कादरी यांचे कक्षात घेवून जावून पंचासमक्ष त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचेकडे मी दिलेली अॅन्थ्रासिन पावडर लावलेली रक्कम 11,000/- रू मिळून आली. त्यावर अॅल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकला असता हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. पंच क्र 2 यांचेकडे असलेले नोटांचे नंबरची पडताळणी केली असता ती मी दिलेली रक्कम असल्याची खात्री झाली.

आज दि. 04/08/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी येथे मी दिलेल्या तक्रारीवरून आज रोजी करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक शेरखान नुरखान पठाण, वय 53 वर्ष व्यवसाय कर निरीक्षक, प्रभाग समिती 'क', महानगर पालीका परभणी रा. जिल्हा परिषद प्राथमिक शाळे जवळ ताडकळस यांनी माझे आईचे नावे प्लॉटचे हस्तांतरण करण्यासाठी 6500/- रू शासकीय फी आणि 4500/-रूपये लाचेची मागणी करून दि. 04/08/2023 रोजी 17.57 वा. कल्याण मंडपम परभणी येथील महानगर पालीका परभणी प्रभाग समिती 'क' च्या कार्यालयामध्ये शासकीय फी 6,500/- रू. व लाच रक्कम 4500/-रू असे मिळून 11000/- रू. स्विकारले आहेत. म्हणून त्यांचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता फिर्याद देत आहे.

माझी फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली आहे. ती मी वाचून पाहिली माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष                                                    फिर्याद दिली सही

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): subhash lachamanna anmulwar(I (Inspector)) / **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): subhash lachamanna anmulw
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ... अंमलदार
नवा मोंढा पोलीस स्टेशन परभणी